# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.02.2026** **वार- रविवार**

---

**<u>महापौर निवडणूक</u>**

पुण्याच्या महापौर आणि उपमहापौर पदाची निवडणूक उद्या सकाळी 11 वाजता, महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात होणार असून, महापालिकेच्या स्थायी समितीसह अन्य विषय समित्यांची निवडणूक येत्या शुक्रवारी होणार आहे.

भाजपातर्फे महापौर पदासाठी मंजुषा नागपुरे तर उपमहापौर पदासाठी रिपब्लिकन पक्षाच्या आठवले गटाचे परशुराम वाडेकर यांनी अर्ज दाखल केले असून काँग्रेसतर्फे अश्विनी लांडगे आणि साहिल केदारी यांनी तर राष्ट्रवादी काँग्रेस तर्फे शितल सावंत आणि दत्ता बहिरट यांनी अर्ज दाखल केले आहेत. संख्याबळाचा विचार करता भाजपचा विजय निश्चित मानला जात आहे.

**<u>झेड पी</u>**

राज्यातल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी पुणे जिल्ह्यातल्या 13 तालुक्यात काल झालेल्या मतदानाची अंतिम टक्केवारी हाती आली असून जिल्ह्यात सरासरी 68 पूर्णांक 35 टक्के मतदान झालं आहे. उद्या सकाळी 10 वाजल्या पासून मतमोजणीला प्रारंभ होणार आहे. जुन्नर तालुक्यात सर्वात कमी 61 पूर्णांक 18 टक्के तर वेल्हे तालुक्यात सर्वाधिक 79 पूर्णांक 28 टक्के मतदान झालं.

**म्हाडा सोडत**

म्हाडाचा विभागीय घटक पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळातर्फे पुणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीएसह सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण प्रकल्पांतील ४ हजार १८६ सदनिकांच्या विक्रीसाठी उद्या दुपारी १२.०० वाजता पुण्यात संगणकीय सोडत काढण्यात येणार आहे.

४ हजार १८६ सदनिकांसाठी एकूण २ लाख ५८ हजार ८३२ अर्ज प्राप्त झाले आहेत, त्यातील अनामत रक्कम भरलेल्या २ लाख १५ हजार ९६५ अर्जदारांचसस सोडतीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

**शेतकऱ्यांच थकीत**

राज्यात यंदाच्या हंगामामध्ये शेतकऱ्यांच्या उसाची रास्त आणि किफायतशीर किमतीची अर्थात एफआरपी देय रक्कम ऊसतोडणी वाहतूक खर्चासह 28 हजार 83 कोटी रुपये असून त्यापैकी प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर 23 हजार 831 कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत.

कारखान्यांकडून शेतकऱ्यांना देय असलेल्या एफआरपीचा थकीत आकडा 4 हजार 252 कोटी रुपये असल्याची माहिती साखर आयुक्तालयातून देण्यात आली असून  थकीत रक्कम पुढील पंधरवड्यात दिली जाणे अपेक्षित आहे.

**भीमाशंकर**

नाशिक येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सुरू असलेल्या विकसकामामुळे महाशिवरात्रीच्या कालावधीतही भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद राहणार आहे.

पुण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी भाविकांनी तसेच स्थानिक नागरिकांनी सदर निर्णयाचे गांभीर्य लक्षात घेऊन मंदिर संस्थान, तसंच प्रशासनाला सहकार्य करावे, असं आवाहन केले आहे.

**गजानन महाराज**

शेगावच्या संत श्री गजानन महाराजांचा  आज एकशे 48 वा प्रगट दिन असून त्यानिमित्ताने शहर परिसरातल्या त्यांच्या विविध मंदिरातून आज विशेष कार्यक्रमांच तसंच महाप्रसाद, भांडाऱ्याच आयोजन करण्यात आले आहे.

**महापौर रवि लांडगे**

पिंपरी चिंचवड शहराचा विस्तार, नवीन निवासी आणि औद्योगिक क्षेत्रांची वाढ आणि पाण्याच्या मागणीत झालेली लक्षणीय वाढ लक्षात घेता वाढणाऱ्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा यंत्रणा अधिक सक्षम ठेवण्याच्या दृष्टीने महापौर रवि लांडगे यांनी निगडी आणि चिखली येथील जलशुद्धीकरण केंद्रांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली.

**ज्येष्ठ व्यक्तींचा सन्मान**

कऱ्हाडे ब्राह्मण संघ, पुणेच्या वतीने आयोजीत तिळगुळ समारंभात, वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ सभासदांचा औक्षण करून सन्मान करण्यात आला. ज्येष्ठ व्यक्तींचा आपुलकीने आणि आदराने सन्मान करत कार्यक्रमाच्या उत्तरार्धात झालेल्या सांगीतिक कार्यक्रमात सदाबहार लोकप्रिय गीते सादर करण्यात आली.

**बाजार**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज सुमारे नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक घटली असून मागणी कायम असल्याने टोमॅटो आणि काकडीच्या भावात वाढ झाली तर तेजीत असणारे तोतापुरी कैरीचे भाव गेल्या आठवड्याच्या तुलनेत खाली आले आहेत.

पालेभाज्यांची आवक घटली असून कोथिंबीर, शेपू, चाकवत यांच्या भावात वाढ झाली.

फळबाजारात उन्हाळी रसाळ फळांची आवक होत असून मागणी ही चांगली असल्याने कलिंगड ,खरबूज, लिंबे आणि पपई महागले आहेत. लग्नसराईच हंगाम सुरू असल्यान फुल बाजारात बाहेरच्या राज्यातूनही मोठ्या प्रमाणावर शोभिवंत फुलांची आवक होत आहे. मागणी वाढल्याने बहुतांश फुलांचे भाव तेजीत आहेत.

**<u>हवामान</u>**

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल 32 आणि किमान 13 अंश सेल्सियस अंश तपमानाची नोंद झाली. उद्या आकाश निरभ्र राहील असा वेध शाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार !**